**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. आमसिध्द मलकारी व्हनखंडे
मु.पो.बोर्गी ब्रुद्रुक, ता.जत,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी** अधिकारी,
जिल्हा परिषद सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी** अधिकारी,
जिल्हा परिषद सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/०५/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४/०६/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मु.पो. बोर्गी बुद्रुक येथील जलस्वराज्य योजनेच्या कामाच्या संदर्भातील एकूण २४ मुद्दे | |

<u>विवेचन</u>

'मला ग्रामसेवक, ग्रामपंचायत बोर्गी बुद्रुक यांनी दि.१/१२/२००८ रोजी मुद्दा क्र. १ ते २४ ची संपूर्ण माहिती दिली असून मी आयोगाकडे केलेले अपील मागे घेत आहे, माझी कुठल्याही प्रकरची तक्रार नाही', असा जबाब अपीलकर्ता श्री. आमसिध्द मलकारी व्हनखंडे यांनी आयोगास सादर केला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.समीर इकबाल अहमद जमादार
रा.विष्णू माछरे गल्ली नं.१, विक्रमनगर,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

१) **जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त संचालक,**
समाज कल्याण संचालनालय
पुणे

**उत्तरवादी**

२) **जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक (अ.जा.उ.य.),**
समाज कल्याण संचालनालय,
पुणे

३) **जन माहिती अधिकारी तथा तथा अवर सचिव,**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, मंत्रालय मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६७/२०१०/कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५/२/२०१०, १८/१२/२००९, ११/१/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४/१/२०१०, १/२/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अनुसुचित जातींच्या सहकारी संस्थांच्या चौकशीच्या अनुषंगा माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.समीर इकबाल अहमद जमादार यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जासाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) अन्वये

अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-**

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजीराव गोविंदराव ओलेकर
मु.पो.कवठे महांकाळ, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
जत, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
कवठे महांकाळ, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
जत, ता.जत, जि.सांगली श्री.आर.एन.कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
कवठे महांकाळ, जि.सांगली प्रतिनिधी श्री.एस.वाय.गोरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.४.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.६.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय नाही. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संभाजीराव गोविंदराव ओलेकर यांनी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्याकडे रोजगार हमी योजनेसंदर्भात पार पाडलेल्या कामांबाबतची सन २००२ ते २००६ अखेरपर्यंतची माहिती मागितली होती.

आपले माहितीबाबत समाधान झाले असून कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी निवेदन अपीलकर्ता यांनी दि.१.६.२००७ रोजी दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती.अनिता राजेंद्र कुंभार
मु.पो.लोणी देवकर,
ता.इंदापूर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
बारामती उपविभाग, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,**
इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८३/२०१०/पुणे |
| २ | **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही.** | |

विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती अनिता राजेंद्र कुंभार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ जोडलेले नाही. तसेच एकापेक्षा जास्त अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपिल केलेले आहे. दोन माहिती - मागणी अर्जासाठी एकत्रितपणे अपील केले आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ★ पुणे खंडपीठ ★

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.व ता.वाळवा,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष,**
औद्योगिक न्यायालय महाराष्ट्र,
प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई-५१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
औद्योगिक न्यायालय महाराष्ट्र,
प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई-५१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८३/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/०२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३/०३/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८/०४/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** औद्योगिक न्यायालय सातारा येथून सांगली न्यायालयात १/०१/२००७ ते ३१/०३/२००७ या कालावधीत बदली झालेल्या खटल्यांबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.७/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. कृष्णा विश्वनाथ जंगम यांच्या माहिती-मागणी अर्जानुसार सांगली औद्योगिक न्यायालयातून सातारा औद्योगिक न्यायालयात वर्ग करण्यात आलेल्या प्रकरणांचे क्रमांक व सदरची प्रकरणे प्रशासकीय कारणास्तव वर्ग करण्यात आल्याचे' प्रपत्रात सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक, औद्योगिक न्यायालय मुंबई श्री.ई.रा.परदेशी यांनी नमूद केले आहे. अपीलकर्ता श्री.जंगम यांनी आयोगाकडील अपिलातील परिच्छेद क्र. ३ मध्ये न्यायसंस्थेबाबत केलेली विधाने व भाष्य आक्षेपार्ह असून माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याची दखल घेता येणार नाही. अशा प्रकारचे भाष्य व मागण्या न करण्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. संभाजी निवृत्ती काळे
रा.माढा रोड,,कुर्डवाडी
जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपमहानिरीक्षक,**
कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पोलिस उपमहानिरीक्षक यांचे कार्यालय,
कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९२/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८/०८/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/१०/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दिनांक ७/०७/२००९ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाहीचीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संभाजी निवृत्ती काळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केलेले नसल्याने सदरचे अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 27 APR 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विठोबा हरी किरवे
मु.पो.गुळूंब, ता.वाई,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
वाई विभाग जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९८/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२/८/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. विठोबा हरी किरवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नाही. तसेच अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 27 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अरुण रावसाहेब कोरे
द्वारा श्री एंटरप्रायझेस, लक्ष्मी मंदिराजवळ,
कवठे पिराण, ता.मिरज, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, आर.के.नकगर,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०६/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/०३/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/०३/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००९-२०१० या कालावधीत निविदा क्र. के-८ लोखंडी रॅक्स खरेदीबाबतची विस्तृत माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अरुण रावसाहेब कोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते त्यांनी ते करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कुलदीप लक्ष्मण मळेकर
गोपाळ सह.गृहरचना संस्था मर्या.प्लॉट नं.अे-८,
वॉर्ड-अे, भांगरवाडी, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे : अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग,
लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२/२०१०/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कुलदीप लक्ष्मण मळेकर
गोपाळ सह.गृहरचना संस्था मर्या.प्लॉट नं.अे-८,
वॉर्ड-अे, भांगरवाडी, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.योगेश गोडसे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१०.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.१२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.१२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मंजूर नकाशा डावलून बिल्डरने केलेल्या बांधकामाच्या संदर्भात आपण दि.२०.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडे माहिती मागितली. परंतु जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे यांनी दि.४.१२.२००९ पर्यंत कोणतेही उत्तर दिले नाही, म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडे अपील केले. मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध असून ती तात्काळ देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. माहिती विहित मुदतीत दिली नसल्यामुळे नि:शुल्क द्यावी, संचिकेची पाहणी करू द्यावी व अन्य कागदपत्रे हवी असल्यास शुल्क स्वीकारून सात दिवसांत माहिती द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे यांनी दिले. नंतर कागदपत्रांच्या प्रती घेण्यास गेलो असता कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे श्री.म.घ.ताराणी यांनी सांगितले. मंजूर नकाशाची नक्कल दिली. परंतु त्यावरील शिक्क्याच्या जागी कागद चिकटवून

दिला. नकाशाबरोबरची अन्य कागदपत्रे दिली नाहीत. संबंधित बांधकामाची जोते तपासणी केली की नाही, प्रत्यक्ष जागेला भेट देऊन पाहणी केली की नाही, हे स्पष्ट केले नाही. बेकायदेशीर कामाला संरक्षण देण्यासाठी व गैरगोष्टी पाठीशी घालण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्याची सातत्याने टाळाटाळ केली असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.कुलदीप लक्ष्मण मळेकर यांनी केली.

बिल्डरने सुधारित नकाशाची प्रत सादर केलेली नसल्यामुळे देता आली नाही. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिल्या. दि.२०.१०.१९९९ च्या अर्जाला दि.१५.१२.२००९ रोजी उत्तर दिले. विहित मुदतीत माहिती न देण्याची चूक झाली. यापुढे दक्षता घेतली जाईल, त्यामुळे शास्ती करू नये, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी यांनी केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसांच्या मुदतीत उत्तर दिले नाही, अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करून देण्याचा आदेश आपण दिला होता. त्यानुसार अपीलकर्त्याने संचिका पाहिल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.योगेश गोडसे यांनी केले.

नकाशावर विशिष्ट जागी कागद चिकटवून देण्यामागचे कोणतेही कारण जन माहिती अधिकारी स्पष्ट करू शकले नाहीत. तसेच बिल्डरने सुधारित आराखडा सादर केलेला नव्हता, हे म्हणणे खोटे असून आमच्या प्रत्यक्ष चर्चेत श्री.ताराणी यांनी अशी प्रत असल्याचे व ती नंतर देण्यात येईल, असे सांगितले होते. बांधकामाच्या तपासणी अहवालाची प्रत असूनही दिली नाही. अत्यंत मर्यादित व बिल्डरला सोयीच्या तेवढ्याच कागदपत्रांच्या प्रती त्यांनी दिल्या, असे अपीलकर्ता श्री.कुलदीप लक्ष्मण मळेकर यानी लेखी व तोंडी नमूद केले व जन माहिती अधिकाऱ्यांनी जी माहिती उपलब्ध नसल्याचे म्हटले, त्याच्या प्रती सादर करण्याची तयारी दर्शविली.

वरील विवेचनातील तपशील लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी यांनी माहिती देण्याबाबत टाळाटाळ केली आहे, एवढेच नव्हे, तर जाणीवपूर्वक माहिती दडविण्याचा प्रयत्न केला आहे, असे स्पष्ट होते. मूळ अर्जानुसार कागदपत्रे देण्याचे व विलंबाबाबत स्पष्टीकरण देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी त्यांना दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल श्री.म.घ.ताराणी यांनी दि.९.४.२०१० च्या पत्रान्वये सादर केला. अर्जदार माहिती प्रत्यक्ष घेणार होते, परंतु विहित मुदतीत ते नगरपरिषद कार्यालयात न आल्यामुळे माहिती तयार असूनही त्यांना देणे शक्य झाले नाही, असे श्री.ताराणी यांनी या अहवालात म्हटले आहे. मात्र माहिती तयार असल्याचे अपीलकर्त्यांना त्यांनी कोणत्याही प्रकारे कळविलेले नाही. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही पूर्ण माहिती त्यांना त्वरित दिलेली नाही, हे पाहता त्यांचा हा खुलासा वस्तुस्थितीशी सुसंगत नाही व असत्य आहे, हे स्पष्ट होते. या सर्व बाबी लक्षात घेता, दि.२०.१०.२००९ च्या अर्जानुसार परिपूर्ण माहिती सुनावणीच्या तारखेपर्यंतही दि.७.४.२०१० पर्यंतही दिलेली नाही. माहिती-मागणी अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही न करणे, माहिती देण्याची टाळटाळ करणे, अपुरी माहिती देणे याबद्दल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी शास्तीस पात्र ठरतात. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी अपीलकर्त्यांनी केली असली तरी यापुढील काळात विहित मुदतीत माहिती देण्याची त्यांनी दिलेली हमी लक्षात घेता अशा कारवाईऐवजी त्याबाबत त्यांना एकदा संधी देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) माहिती देण्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार विहित मुदतीत कार्यवाही न करणे, माहिती विलंबाने व अपुरी देऊन पर्यायाने माहिती नाकारणे याबद्दल

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी यांना रूपये २५०००/- शास्ती करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे श्री.म.घ.ताराणी यांच्या मे २०१० व जून २०१० या महिन्यांच्या अनुक्रमे जून २०१० व जुलै २०१० मध्ये मिळणाऱ्या वेतनातून दोन समान हप्त्यांत ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे यांनी करावी, व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि.२७.४.२०१०

माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

ॲड. राजीव आ.लाले
२९२, लाले बंगला, महावीर नगर,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
कृष्णाश्रय कॉम्प्लेक्स, वखारभाग,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
श्री भैरवनाथ जीवन विकास संस्था,
ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२२/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०/१२/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०/८/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री भैरवनाथ जीवन विकास संस्था, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली या संस्थेच्या पदधिकाऱ्यांची नावे, पत्ते, नियोजित आयुर्वेदिक वैद्यकीय कॉलेजच्या मान्यतेसाठी दाखल केलेल्या प्रस्तावाची प्रत, व ठेव पावत्यांच्या छायाप्रती | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२१४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता अॅड. राजीव आ.लाले यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दिपीक उमेदलाल शहा
वृंदावन, कॉलेज कॉर्नर जवळ,
माधवनगर रोड,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष,**
श्री गुजराथी सेवासमाज,
२५०, वखारभाग, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
श्री गुजराथी सेवासमाज,
२५०, वखारभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२८/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/१०/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री गुजराथी सेवासमाज, सांगली या संस्थेची घटना व भारत कॉम्प्लेक्स मधील फ्लॅट नं.३२१, गिरनार कॉम्प्लेक्स मधील फ्लॅट नं. डी ४/५६, ५/४१ या वादग्रस्त फ्लॅटबाबतची कागदपत्रे | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. दिपीक उमेदलाल शहा यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. ज्ञानेश्वर आश्राप्पा शिंदे
मु.पो.टेंभुर्णी (भवानी नगर),
ता.माढा, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहित्ती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,** **उत्तरवादी**
नवीन प्रशासकीय इमारत, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२९/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/१२/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ऑगस्ट २००८ ते नोव्हेंबर २००९ मध्ये आश्रमशाळेतील जादा तुकडी वाढी संदर्भात दाखल झालेले प्रस्ताव व त्यास दिलेली शिफारस इत्यादी माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर आश्राप्पा शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने तसेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याने आयोगाकडे दाखल केलेल्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नरेंद्र गंगाधर टिकारे
८९७, भवानी पेठ, नवमहाराष्ट्र मंडळाजवळ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापकीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३ / पुणे /२०१० |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नरेंद्र गंगाधर टिकारे
८९७, भवानी पेठ, नवमहाराष्ट्र मंडळाजवळ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद प्रतिनिधी श्री.सैय्यद फैज

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.१०.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.निकाल नाही. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कुरेश जमात मस्जिद व ट्रस्टचे लेखापरीक्षण अहवाल व अन्य माहिती जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद यांच्या पातळीवरून मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.नरेंद्र गंगाधर टिकारे यांनी केली.

संपूर्ण राज्यातून धर्मादाय आयुक्तांकडून वक्फ मंडळाकडे कागदपत्रे येत आहेत. या कागदपत्रांच्या संकलनाचे काम अद्याप चालू आहे. नुकतेच हे काम सुरू झालेले असल्यामुळे विलंब लागत आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे श्री.सय्यद फैज यांनी केले. माहिती पुरविण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी विनंती अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद यांनी लेखी निवेदनाद्वारे केली.

तीन दिवसांत माहिती देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला कुरेश जमात ट्रस्टने लेखापरीक्षण अहवाल सादर केलेले नाहीत. त्याबाबत संबंधितांना नोटिस देण्यात येत आहे. धर्मादाय आयुक्तांकडून संबंधित संस्थेबाबतची माहिती आपल्याकडे वर्ग झाली नसल्यामुळे इतर माहिती देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद श्री.सैय्यद नुरूल जफर यांनी दि.२२.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन भूमिका स्पष्ट करणारे असले तरी संबंधित माहिती त्यांनी अपीलकर्त्यास त्वरित प्राप्त करून देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) कुरैश जमात ट्रस्टच्या लेखापरीक्षण अहवालाबाबत केलेल्या कार्यवाहीविषयक कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात. तसेच या ट्रस्टच्या विश्वस्तांची नावे व पत्ते प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावे. ही कार्यवाही दि.२५.४.२०१० पर्यंत पूर्ण करून जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्कीजवळ, औरंगाबाद यांनी आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनकर लक्ष्मण वाढोकार
१७/८, डी-१, एम.आय.डी.सी., चिंचवड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३१+८३२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिनकर लक्ष्मण वाढोकार
१७/८, डी-१, एम.आय.डी.सी., चिंचवड, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले-पाटील रोड, पुणे श्री.सी.ए.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.१२.२००७ |
| ६ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्याने दि.११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री क्षत्रिय माळी समाज विकास मंडळ या न्यासाच्या चौकशीची मागणी अपीलकर्ता यांनी केली होती. त्यानुसार चौकशी झाली व त्याबाबतची त्यांना हवी असलेली माहिती दिली. त्या संदर्भात ते वारंवार पत्रव्यवहार करून विविध स्वरूपाचे मुद्दे उपस्थित करीत असतात व न्यासाचे पदाधिकारी, सदस्य यांच्यावर कारवाई का केली नाही, याबाबत खुलाशाच्या स्वरूपाची विचारणा करीत असतात. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाहीत. न वाचता येण्यासारखे गिचमिड स्वरूपाचे लेखन त्यांच्या पत्रव्यवहारात असते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.सी.ए.पाटील यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता त्यांचे प्रतिपादन रास्त आहे, असे स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

पुणे

28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रकाश रामचंद्र शिदोरे
तर्फे कुलमुखत्यार श्री. रामचंद्र दिनकर शिदोरे,
४५, आनंदनगर, पुणे-सिंहगड रोड,
हिंगणे खुर्द, पुणे-५१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे शहर (४),
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे-५

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे शहर (४),
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे-५

**२) जन माहिती अधिकारी तथा चेअरमन /सेक्रेटरी,**
खरेवाडी सह-गृहरचना संस्था मर्यादित,
प्लॉन नं.५, आनंदनगर, पुणे-५१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३५/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/१०/२००९, १२/०१/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०/१०/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/११/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८/०२/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** खरेवाडी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, आनंदनगर, पुणे या संस्थेच्या संदर्भातील कागदपत्रांच्या छायाप्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रकाश रामचंद्र शिदोरे तर्फे कुलमुखत्यार श्री रामचंद्र दिनकर शिदोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.